# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६.०७.२०१०

## ठाणे महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मा.सर्वसाधारण सभा क्रमांक ४ दिनांक १६.०७.२०१०**
**सभा सूचना क्रमांक ३ दिनांक ६.०७.२०१०ची**
**सभा क्रमांक १ दिनांक १६.०७.२०१०**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १६.०७.२०१० रोजी सायंकाळी ठिक ४.०० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या ' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ' सभागृहात सभा सूचना क्रमांक ३ दिनांक ६.०७.२०१० रोजींच्या विषयांवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सदरच्या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१ ) श्री. अशोक बारकू वैती- मा.महापौर .
२ ) श्री. मनोज विठ्ठल लासे- मा. उप महापौर

| | |
|---|---|
| ३. श्रीमती पाटील कविता सुरेश | ४. श्री.आनंदा तुकाराम केसरे |
| ५. श्री मधुकर रामचंद्र पावशे | ६. .सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र |
| ७. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर | ८. श्री.दिनेश मनोर पाथरे |
| ९. श्री.रामचंद्र लहू फडतरे | १०. श्री.जगदाळे हणमंत ज्ञानू |
| ११. सौ.ताई मारुती भोंडवे | १२. श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदीश |
| १३. श्रीमती अनिता अशोक सावंत | १४. सौ.वनिता गंगाराम इंदिसे |
| १५. श्री. सुरेश दाजी भोईर | १६. श्री.रविंद्र माणिक पाटील |
| १७. श्रीमती तरे महेश्वरी संजय | १८. श्रीमती शारदा दादू पाटील |
| १९. श्रीमती छाया मनोहर राव | २०. सौ. परिषा प्रताप सरनाईक |
| २१. श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत | २२. श्री.कांबळे सुरेश चंदू |
| २३. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह | २४. सौ.एकता एकनाथ भोईर |
| २५. श्री. संतोष वसंत वडवले | २६. श्री.दशरथ बाबुराव पालांडे |
| २७. श्री.राऊळ अशोक राजाराम | २८. कु.योगिता रमेश वैती |
| २९. श्रीमती मुल्ला फातिमा अंजूम मुहम्मद असिफ | ३०.श्री.कोकाटे सुधीर विष्णू |

३१. श्रीमती कदम रुपाली रमेश
३२.श्री.मुल्ला नजीब सुलेमान
३३. सौ.गौरी अनिता सुनिल
३४. श्री.पाटील उमेश काशिनाथ
३५. सौ.साळवी अपर्णा मिलींद
३६.श्री.कांबळे दिनेश दाजी
३७. श्री. अशोक नारायण भोईर
३८.श्रीमती खातू सुरेखा सुरेश
३९. सौ.प्रमिला मुकूंद केणी
४०.श्री.नारायण शंकर पवार
४१.श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
४२.श्री.वाघुले संजय संतू
४३.श्रीमती पाटील सुजाता भास्कर
४४.श्रीमती अनिता हिराकांत फर्डे
४५.श्री.राम पांडुरंग रेपाळे
४६.श्री.जनार्दन कृष्णा खेतले
४७.श्री.शैलेश तुकाराम शिंदे
४८. श्री.होडावडेकर मधुकर विठठल
४९. डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
५०. श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
५१. सौ.पाटील प्रभावती माणिक
५२. श्रीमती कदम निता मदन
५३. श्री.मोरे संजय भाऊराव
५४. श्री.कणसे घनश्याम शिवाजी
५५. श्री.सावंत शैलेश तुकाराम
५६. श्री.फाटक रविंद्र सदानंद
५७. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
५८. सौ.संगिता मिलिंद बनकर
५९. श्री.लक्ष्मण (लच्छू)चंदुमल टिकमाणी
६०. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
६१. श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
६२. श्री.खारकर राजेश आत्माराम
६३. श्री.खारकर सुभाष आत्माराम
६४. श्रीमती काकडे अनिता बालाजी
६५. श्री.साप्ते राजेंद्र रमेश
६६. श्री.मढवी रमाकांत दशरथ
६७. श्री.शिवदास नाना भगत
६८ .श्री.राजन नारायण किणे
६९. श्री. अन्सारी असलम सलीम
७०. श्रीमती खान शगुफता नसीर
७१. सौ. राऊत आशरीन ईब्राहिम
७२. श्री. डोंगरे सिराज अहमंद अली
७३. श्री. अनिल गजाानन सावे
७४. श्री. सन्नी वर्गीस थॉमस

**रजा सदस्य :-**

१) श्री. बाळकृष्ण पुंडलीक पाटील
२) सौ. स्मिता सुभाष इंदुलकर

**गैरहजर सदस्य :-**

१) श्री. संजय रामचंद्र तांडेल
२) श्री.सारंग राजेश नामदेव
३) श्री. राजेश रामचंद्र ठाकूर
४) श्री.नागसेन (भैय्यासाहेब) गंगाराम इंदिसे
५) श्री.सुधाकर वामन चव्हाण
६) सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील
७) श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
८) श्री.भोईर संजय देवराम
९) श्री.भोईर देवराम लक्ष्मण
१०) श्री.एगडे राम हरी
११) श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे
१२) श्रीमती यादव केवळादेवी रामनयन
१३) श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव
१४) श्री.विचारे राजन बाबूराव
१५) श्री.सोनार संजय प्रभाकर
१६) श्री.साळवी संतोष गजानन
१७) श्री.पाटणकर मिलिंद माधव
१८) श्री.मिलिंद भारत पाटील
१९) श्रीमती शांता शामजी सोलंकी
२०) श्री.बिष्ट महदिप उर्फ मुन्ना
२१) श्री.सामंत विलास शिवराम
२२) श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
२३) श्री.वैती हरीश काशिनाथ
२४) श्री.मनोज तुकाराम शिंदे
२५) सौ.घाग संगीता चंद्रगुप्त
२६) श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
२७) श्री.सचिन जयराज म्हात्रे
२८) सौ.मनिषा महेश साळवी
२९) श्री. गणेश यशवंत साळवी
३०) श्री.कुरेशी यासीन अय्युब
३१) श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
३२) सौ. अनिता राजन किणे
३३) श्री.भगत सुधिर रामचंद्र
३४) सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र
३५) श्री. महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
३६) श्रीमती नाईक हफीजा नसरुददीन
३७) श्रीमती शेख रजिया इकबाल
३८) श्रीमती अन्सारी इमतियाजबानू उर्फ (बेबी आपा)
३९) श्री. सुभाष गणू भोईर
४०) श्री. म्हात्रे दिलीप रतन
४१) श्री. नरेश गणपत म्हस्के
४२) श्री. पवन काशिनाथ कदम
४३) श्री. मिलींद मनाहेर साळवी

**मा.महापौर सो., छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.**

**तद्‌नंतर राष्ट्रगित होऊन सभेस सुरुवात होते.**

**मा.सचिव सो., सभेचा अजेंडा वाचून दाखवितात.**

**मा. सचिव :-**

आजच्या सभेपुढे सन्मा.सदस्य श्री.बाळकृष्ण पुंडलिक पाटील व सौ.स्मिता सुभाष इंदुलकर हयांनी रजेचा अर्ज दिलेला आहे.

**मा.सभागृह नेते :-**

ठाणे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री. पद्माकर संभाजी कांबळे हयांचे दुःखद निधन झालेले आहे. त्या संदर्भात सभागृहासमोर सभा तहकूबी मांडण्यांत आलेली आहे. कृपया वाचून दाखविण्यांत यावी.

**( मा.सचिव तहकूबी सूचना वाचून दाखवितात. )**

दिनांक : १५.७.२०१०

प्रति,
सन्मा.श्री.अशोक बारकू वैती सो.,
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

यांसी सस्नेह जय महाराष्ट्र !

विषय :- शुक्रवार दि.१६.७.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेत सन्मा.सदस्य श्री.पद्माकर सभांजी कांबळे यांचे निधनाचा दुखवटा ठराव घेऊन सभा पूर्ण वेळ तहकूब करणे बाबत.

महोदय,

ठाणे महानगरपालिकेच्या शुक्रवार दिनांक १६.०७.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्र.३६ चे सन्मा.सदस्य श्री.पद्माकर कांबळे यांचे दुःखद निधनाचा ठराव घेऊन त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी, ही विनंती.

<u>दुखवटा ठराव</u>

ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३६ चे विद्यमान नगरसेवक श्री.पद्माकर संभाजी कांबळे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९.०६.२०१० रोजी दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ४८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगी, १ मुलगा, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

५...

ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३६ चे विद्यमान नगरसेवक श्री.पद्माकर संभाजी कांबळे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९.०६.२०१० रोजी दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ४८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगी, १ मुलगा, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

श्री.पद्माकर संभाजी कांबळे हे ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ६४ मधून २००१ मध्ये झालेल्या पोटनिवडणूकीमध्ये प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर २००२ व २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निवडून आले. २००४ मध्ये त्यांनी गलिच्छ वस्ती सुधारणा समितीचे सभापती पदही भुषविले होते. अत्यंत साधा स्वभाव, साधे रहाणीमान व मितभाषी असलेले श्री.कांबळे लोकप्रिय असे नगरसेवक होते. त्यांनी नगरसेवक पदाच्या कारकिर्दीमध्ये नागरिकांना सोयी-सुविधा देण्यासाठी अथक मेहनत घेतली. त्यांच्या दुःखद निधनामुळे ठाणे शहरामध्ये हळहळ व्यक्त करण्यांत येत आहे.

श्री.पद्‌माकर संभाजी कांबळे हयांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली असून, हे दुःख त्यांचे कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवो व कै. पद्माकर कांबळे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडूरंग पाटील                                        अनुमोदक : श्री.नजीब मुल्ला

(मा.सचिव सन्मा.विरोधी पक्षनेते हयांची सभा तहकूबी सूचना वाचून दाखवितात.)

दिनांक १४.०७.२०१०

प्रति,
मा.महापौर सो.,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

यांसी,
स.न.वि.वि.
विषय :- सभा तहकूबी सूचना.

महोदय,

बेळगांव, गुलबर्गा येथे कर्नाटक सरकारच्या अन्यायाविरुध्द कर्नाटक सरकारचा निषेध करण्यासाठी काढण्यांत आलेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या मोर्चावर कर्नाटक पोलिसांनी अमानुष लाठीमार करीत मोर्चा चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. मराठी बांधवांवर लाठया चालवितांना कानडी पोलिसांनी जनरल डायरलाही लाजविले. शांततेत चाललेल्या मोर्चातील तरुणांसह वृध्दांवरही हल्ला करीत डोकी फोडली आणि सीमावासियांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. हाताला काळे कापड, निषेधाचे फलक, काळे झेंडे आणि धिक्काराच्या घोषणा देत कर्नाटक सरकार विरोधात आपली तीव्र नाराजी सीमा बांधवांनी व्यक्त केली.

सदर मोर्चामध्ये सहभागी झालेल्या तरुणांची आणि महिलांची संख्या पाहून कर्नाटक प्रशासन चांगलेच हादरले. प्रचंड पोलिस बंदोबस्त असतांनाही महाराष्ट्रात येण्यासाठी धडपडणा-या या मराठी बांधवांनी न्यायालयाच्या आवारात ‘ कन्नड रक्षक वेदिका ’ चा ध्वज उतरवून तेथे भगवा ध्वज फडकवला. त्यामुळे कर्नाटकी पोलिसांनी मराठी बांधवांवर लाठीचार्ज केला. या लाठीचार्जमध्ये तरुण व वृध्द मराठी बांधव मोठया प्रमाणात जखमी झाले.

तरी या प्रकरणाचा निषेध म्हणून आज दिनांक १६.७.२०१० रोजींची महासभा तहकूब करण्यांत यावी ही विनंती.

सूचक : श्री.नजीब मुल्ला अनुमोदक : श्री.नारायण पवार

**(मा.सचिव सो., सन्मा. सदस्य श्री.दशरथ पालांडे हयांची लक्षवेधी सूचना वाचून दाखवितात.)**

दिनांक : १४.७.२०१०

प्रति,
सन्मा.श्री.अशोक बारकू वैती सो.,
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

यांसी, सस्नेह जय महाराष्ट्र !
विषय :- शुक्रवार दिनांक १६.०७.२०१० रोजी होणा-या मा.महासभेत लक्षवेधी सूचना घेणे बाबत.

महोदय,
ठाणे महानगरपालिकेच्या शुक्रवार दिनांक १६.०७.२०१०रोजी होणा-या मा.महासभेमध्ये खालील प्रमाणे देत असलेली लक्षवेधी सूचना चर्चेस घेण्यांत यावी, ही विनंती.

**लक्षवेधी सूचना**

बेळगांव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह ८६५ मराठी बहुभाषिक भाग कर्नाटक राज्याच्या मगरमिठीतून सोडविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या माध्यमातून गेली ५४ वर्षे अनेक संकटांना सामोरे जावून सीमा प्रश्न सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केले जात आहेत. तसेच याबाबत अनेक आंदोलने, मोर्चे, जनजागृती करुन येथील नागरिकांनी महाराष्ट्र राज्यात विलीन होण्यासाठी धडपड केली व गेली ५४ वर्षे त्यांनी आपला लढा अविरतपणे चालू ठेवला आहे. यामध्ये कित्येकांना आपले बलीदानसुध्दा द्यावे लागले आहे.

आज कर्नाटक राज्यात येत असलेल्या ८६५ गांवातील जनतेला कर्नाटक सरकारच्या हुकूमशाही कारभारास तोंड द्यावे लागत आहे. हे मराठी भाषिक असतांनासुध्दा त्यांचेवर कानडी भाषेची जबरदस्ती केली जाते. त्यांचेवर अनेक प्रकारचे अन्याय केले जात आहे त्यामुळे गेली कित्येक वर्षे या नागरिकांना मरण यातना भोगावी लागत आहे. आपल्या देशाच्या राज्य घटनेप्रमाणे भाषा प्रांतानुसार राज्याची विभागणी झाली. परंतू बेळगांव सीमा भागात मराठी भाषिक असून देखिल त्यांच्यावर आज सर्व स्तरांतून अन्याय होत आहे. याला न्याय वाचा फोडण्यासाठी व आपला हक्क मिळविण्यासाठी येथील नागरिकांनी काढलेल्या मोर्चावर कर्नाटक सरकारने पोलिसांच्या माध्यमातून अमानुष लाठीमार केला ही दुर्दैवी बाब आहे. बेळगांवसह मराठी बहुल सीमाभाग महाराष्ट्रात दाखल यासाठी लढे देतांना येथील नागरिक महाराष्ट्राकडे आशेने पहात आहेत. आज राज्य शासन व केंद्र शासनाचे सीमा प्रश्नाबाबत लक्ष वेधण्यासाठी सभागृहात चर्चा घडवून आणावी व कर्नाटक सरकारच्या माध्यमातून होत असलेल्या अतयाचाराचा तीव्र निषेध करणसाठी ही सर्वसाधारण सभा तहकूब करावी , ही विनंती.

सूचक : श्री.दशरथ बाबुराव पालांडे                    अनुमोदकः-श्री.संतोष वसंत वडवले

**मा.सभागृह नेते :**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेपुढील आयत्यावेळेच्या विषयांसह ही सर्वसाधारण सभा तहकूब करण्यांत यावी.

**मा.विरोधी पक्ष नेता :**

सन्मा.सभागृह नेते यांच्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :**

कर्नाटक प्रांतामध्ये मराठी भाषिक जनतेवर होणा-या अन्यायाचा निषेध म्हणून, तसेच विद्यमान सदस्य श्री. पद्माकर संभाजी कांबळे हयांचे दुःखद निधन झालेले आहे, त्यांच्या आत्मास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा तहकूब करण्यांत येत आहे.

## दुखवटा ठराव

## ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ७३ दिनांक १६/०७/२०१०

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३६ चे विद्यमान नगरसेवक श्री.पद्माकर संभाजी कांबळे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९.०६.२०१० रोजी दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ४८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगी, १ मुलगा, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

श्री.पद्माकर संभाजी कांबळे हे ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ६४ मधून २००१ मध्ये झालेल्या पोटनिवडणूकीमध्ये प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर २००२ व २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निवडून आले. २००४ मध्ये त्यांनी गलिच्छ वस्ती सुधारणा समितीचे सभापती पदही भुषविले होते. अत्यंत साधा स्वभाव, साधे रहाणीमान व मितभाषी असलेले श्री.कांबळे लोकप्रिय नगरसेवक होते. त्यांनी नगरसेवक पदाच्या कारकिर्दीमध्ये नागरिकांना सोयी-सुविधा देण्यासाठी अथक मेहनत घेतली. त्यांच्या दुःखद निधनामुळे ठाणे शहरामध्ये हळहळ व्यक्त करण्यांत येत आहे.

श्री.पद्माकर संभाजी कांबळे हयांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली असून, हे दुःख त्यांचे कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवो व कै. पद्माकर कांबळे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडूरंग पाटील

अनुमोदक : श्री.नजीब मुल्ला

सही/- श्री. अशोक बारकू वैती
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**(तद्‌नंतर मृतात्म्यास श्रध्दांजली अपर्ण करुन मा.महापौर सभा तहकूब केल्याचे जाहिर करतात.)**

**सही/ श्री. अशोक बारकू वैती.**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ- सायंकाळी ४.३० वा.**
**दिनांक :-१६/०७/२०१०**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**महानगरपालिका, ठाणे.**

**(सही/-सौ. छाया मानकर)**
**महापालिका सचिव**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे. ठाणे**